**एखादा प्रशासकीय विभाग/मंडळ/संस्थेस भाडेपट्ट्याने /कब्जेहक्काने प्रदान केलेल्या शासकीय जमिनींवरील सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदस्यत्वाबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक जमीन-२०१७/प्र.क्र.९८/ज-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
**दिनांक:- २९ मे,२०१९**

**संदर्भ:-**

१. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एलसीएस०६०६/प्र.क्र.५४/ज-१, दि.२५.५.२००७
२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. जमिन-१०/२००३/प्र.क्र.४०१/ज-१, दि.२५.७.२००७
३. शासन पत्र, महसूल व वन विभाग क्र. एलसीएस१०/०३/प्र.क्र ४७८/ज-१, दि.२५.७.२००७
४. शासन शुध्दीपत्रक,महसूल व वन विभाग क्र.जमीन-११/२०१३/प्र.क्र.४९८/ज-१,दि.५.१२.२०१३
५. शासन निर्णय क्र. एलसीएस-०९/२०१३/प्र.क्र.४५०/पुनर्बांधणी/ज-१, दि.०१.०६.२०१५.
६. शासन निर्णय क्र. महसूल व वन विभाग जमीन-२०१७/प्र.क्र.९८/ज-१, दि.०७.०७.२०१७
७. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.जमीन-२०१७/प्र.क्र.१२७/ज-१, दिनांक ०७.०७.२०१७
८. शासन निर्णय,महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१२७/ज-१,दिनांक ०४.०५.२०१८

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम-४० व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ च्या नियम-२७ मधील तरतूदीनुसार सहकारी गृहनिर्माण संस्थांना निवासी प्रयोजनार्थ कब्जेहक्काने अथवा भाडेपट्टयाने शासकीय जमीन प्रदान करण्यात येते. या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या सर्व आदेशांचे संकलन करुन दिनांक २५.०५.२००७ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. प्रदान करण्यात आलेल्या शासकीय जमिनीवरील सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सदनिका / गाळा हस्तांतरीत करतांना आकारावयाचे अधिमूल्य संदर्भाधीन अ.क्र.७ शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.जमीन-२०१७/प्र.क्र.१२७/ज-१, दिनांक ०७.०७.२०१७ येथील शासन निर्णयान्वये सुधारीत करण्यात आले असून या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.३ मध्ये विनापरवानगी झालेले हस्तांतरण नियमित करतांना आकारावयाच्या अधिमूल्याची तरतुद करण्यात आली आहे. प्रदान केलेल्या शासकीय जमिनीवरील सहकारी गृह निर्माण संस्थेचे सदस्यत्व सक्षम प्राधिकाऱ्यांची परवानगी न घेताच बहाल केल्याचे देखील अनेक प्रकरणांमध्ये दिसून आल्यामुळे असे विनापरवानगी हस्तांतरण किंवा सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यते शिवाय अशा सहकारी गृहनिर्माण संस्थेने दिलेले सदस्यत्व कशा प्रध्दतीने नियमित करण्यात यावे याबाबत कार्यवाही करण्यासंदर्भात संदर्भाधीन अ.क्र.६ येथील क्रमांक शासन निर्णय क्र. महसूल व वन विभाग जमीन-२०१७/प्र.क्र.९८/ज-१, दिनांक ०७.०७.२०१७ च्या शासन निर्णयान्वये क्षेत्रीय महसुली यंत्रणांना दिशा निर्देश देण्यात आले आहेत. या शासन निर्णयान्वये देण्यात आलेले दिशानिर्देश फक्त भाडेपट्टयाने / कब्जेहक्काने प्रदान करण्यात आलेल्या शासकीय जमिनीवरील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतीमधील सदस्यांनाच लागू आहेत. मात्र शासनाद्वारे एखादा प्रशासकीय विभाग/मंडळ अथवा संस्थेस प्रदान केलेल्या जमिनीवरील सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सदस्यत्व नियमित



Scanned with OKEN Scanner

करण्यासाठी तसेच अशा सहकारी गृहनिर्माण संस्थातील सदनिका हस्तांतरणाबाबत झालेले व्यवहार/शर्तभंग नियमानुकूल करण्यासाठी देखील हे शासन निर्णय लागू आहेत काय याबाबत लोकप्रतिनिधी / जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शासनाकडे विचारणा करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने शासनाने प्रशासकीय विभागांना अथवा कोणत्याही प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखालील महामंडळांना अथवा मंडळाला प्रदान केलेल्या जमिनीवरील सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदस्यत्व सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेशिवाय प्रदान करण्यात आले असल्यास किंवा अशा सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदनिकांचे विनापरवानगी झालेले हस्तांतरण नियमित करावयाचे असल्यास या बाबतीत देखील वरील संदर्भाधीन अ.क्र.६ व ७ येथील शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.जमीन-२०१७/प्र.क्र.१२७/ज-१, दिनांक ०७.०७.२०१७. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.जमीन-२०१७/प्र.क्र.९८/ज-१, दिनांक ०७.०७.२०१७ मधील तरतुदी लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय:-</u>**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतूदीनुसार किंवा तत्पूर्वी शासनाच्या एखादया प्रशासकीय विभागाला अथवा महामंडळाला अथवा मंडळाला प्रदान केलेल्या जमिनीवरील सहकारी गृहनिर्माण संस्थामधील सदस्यत्व सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेशिवाय प्रदान करण्यात आले असल्यास असे सदस्यत्व शासन निर्णय क्र.जमीन-२०१७/प्र.क्र.९८/ज-१, दि.०७ जुलै, २०१७ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब व आवश्यक आकार वसूल करुन नियमानुकूल करण्याकामी निर्णय घेण्यात यावा, तसेच अशा सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सदनिका विनापरवानगी हस्तांतरीत करण्यात आली असेल तर, असे विनापरवानगी झालेले हस्तांतरण शासन निर्णय क्र. जमीन २०१७/प्र.क्र.१२७/ज-१, दिनांक ०७ जुलै, २०१७ अन्वये विहीत करण्यात आलेला "हस्तांतरण आकार" वसूल करुन नियमीत करण्याकामी निर्णय घेण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१९०५२९१५३५४४५०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

**(प्रकाश इंदलकर)**
**शासनाचे अवर सचिव**

**प्रत:-**

१) मा.राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,राजभवन,मुंबई.

२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई.

३) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.



Scanned with OKEN Scanner

४) मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) महालेखापरिक्षक (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता), नागपूर/मुंबई.

६) प्रधान सचिव, विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.

७) अपर मुख्य सचिव ( महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी ) यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई

८) सर्व विभागीय आयुक्त/उपायुक्त (महसूल) विभागीय आयुक्तांचे कार्यालय

९) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१०) सर्व जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी/निवासी उपजिल्हाधिकारी.

११) सर्व सह सचिव/उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१२) "ज" समूहातील सर्व अवर सचिव/कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई.

१३) निवडनस्ती (ज-१)

***********



Scanned with OKEN Scanner